दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र

मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ

बीड महाराष्ट्र | गुरुवार, 15 ऑक्टोबर 2026 | अंक क्र. 152 | वर्षे 4 थे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com

आपल्याकडे काही न्युज संबंधित महत्वाचे व्हीडिओ असतील तर खालील नंबर पाठवा.
मो. 8421577797
आपले नाव गुपीत ठेवण्यात येईल

# संभाजीनगर पोलिसांनी हिंद नगरयेथील मारहाण प्रकरणात फरार असलेल्या तीन आरोपींना शिताफीने केली अटक

## संभाजीनगर परळी वै. पोलिसांची उल्लेखनीय कारवाई ; ६ महिन्यांपासून फरार असलेल्या ३ आरोपींना अटक

■ परळी ( प्रतिनिधी):

परळी शहरातील हिंद नगर परिसरात झालेल्या गंभीर मारहाण प्रकरणातील गेल्या सहा महिन्यांपासून फरार असलेल्या तीन आरोपींना संभाजीनगर परळी वै. पोलिसांनी शिताफीने अटक केली आहे. न्यायालयाने आरोपींची रवानगी जिल्हा कारागृह बीड येथे (MCR) केली आहे.

दिनांक १४ एप्रिल २०२६ रोजी परळी शहरातील हिंद नगर परिसरात अमर वाईन शॉपसमोर मंगेश रवींद्र बचाटे (रा. शिवाजी नगर, परळी) यांना रॉडने, गजाने आणि दगडाने मारहाण करून गंभीर जखमी करण्यात आले होते. याप्रकरणी मंगेश बचाटे यांच्या तक्रारीवरून संभाजीनगर परळी वै. पोलीस ठाण्यात गुरं. क्र. ९५/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता (BNS) २०२३ मधील विविध कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणात १) ऋषिकेश बचाटे, २) तानाजी बचाटे आणि ३) शिवाजी बचाटे (सर्व रा. स्टेशन वडगाव, ता. सोनपेठ, जि. परभणी) यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदवला गेला होता. गुन्हा दाखल झाल्यापासून हे तिन्ही आरोपी गेल्या सहा महिन्यांपासून पोलिसांना गुंगारा देऊन फरार होते.

आरोपींनी अटक टाळण्यासाठी मा. अपर सत्र न्यायालय अंबाजोगाई आणि त्यानंतर मा. उच्च न्यायालय मुंबई (खंडपीठ औरंगाबाद) येथे अटकपूर्व जामिनासाठी अर्ज दाखल केले होते. मात्र, पोलिसांनी न्यायालयात खंबीरपणे योग्य ते म्हणणे सादर करून आरोपींचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळवून लावला.

गोपनीय बातमीदार आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे पोलिसांनी आरोपींचा माग काढला. १३ ऑक्टोबर २०२६ रोजी: आरोपी ऋषिकेश बचाटे आणि तानाजी बचाटे यांना अटक करण्यात आली.

१४ ऑक्टोबर २०२६ रोजी आरोपी शिवाजी बचाटे यास शोधून ताब्यात घेण्यात आले. पोलीस पथकाने त्यांच्या मूळ गावी (स्टेशन वडगाव, ता. सोनपेठ, जि. परभणी) जाऊन शिताफीने आरोपींना ताब्यात घेतले. त्यानंतर त्यांना मा. प्रथमवर्ग न्यायालय परळी वै. येथे हजर केले असता, न्यायालयाने आरोपींची न्यायालयीन कोठडीत (MCR) रवानगी करून त्यांची बीड येथील जिल्हा कारागृहात रवानगी केली आहे.



■ सदरची कारवाई नवनीत कॉवत (पोलीस अधीक्षक, बीड), चेतना तिडके (अपर पोलीस अधीक्षक,(अंबाजोगाई) आणि ऋषिकेश शिंदे (सहाय्यक पोलीस अधीक्षक, उपविभाग अंबाजोगाई) यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या कारवाईत संभाजीनगर पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सपोनि अनमोल केदार, पोउपनि पुजरवाड, ग्रे.पोउपनि श्री. नागरगोजे, सफौ/११६६ थळकरी, पोशि/७१० चव्हाण, पोशि/१९३२ धुमाळ आणि पोशि/१७२१ डोंगळे यांच्या पथकाने महत्त्वाची भूमिका बजावली.

# आष्टी, पाटोदा, शिरूर कासारच्या पाणीप्रश्नासाठी २० टीएमसी पाण्याची मागणी

## भीमराव धोंडे यांची जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याशी मुंबईत भेट; चारा अनुदान आणि रोजगाराच्या मागण्याही मांडल्या

■ आष्टी प्रतिनिधी :

दुष्काळग्रस्त आष्टी, पाटोदा आणि शिरूर कासार तालुक्यांतील पाणीटंचाई दूर करण्यासाठी जायकवाडी धरणातून थेट पाइपलाइनद्वारे १५ ते २० टीएमसी पाणी उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी माजी आमदार भीमराव धोंडे यांनी जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे केली. बुधवारी, १४ ऑक्टोबर रोजी मुंबईत झालेल्या भेटीदरम्यान त्यांनी पाणीपुरवठा, सिंचन, पशुधनासाठी चारा अनुदान आणि मजुरांना रोजगार उपलब्ध करून देण्यासंदर्भातील प्रश्न मांडले.

धोंडे यांनी जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे जायकवाडी धरणातून थेट पाइपलाइनद्वारे पाणी आणण्याची मागणी केली. तसेच आष्टी लिफ्ट सिंचन योजना क्रमांक तीनअंतर्गत शिंपोरा ते खुंटेफळ साठवण तलावात येणाऱ्या पाण्याचे इतर तलावांमध्ये वितरण करण्यासाठी नियोजन करावे, असेही त्यांनी सुचविले. या विषयावर चर्चा करण्यासाठी लवकरच बैठक घेण्याचे आश्वासन जलसंपदामंत्र्यांनी दिल्याचे धोंडे यांनी सांगितले.

त्यानंतर धोंडे यांनी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेऊन दुष्काळग्रस्त गावांतील पाणीटंचाई, पशुधनासाठी चारा आणि शेतमजुरांच्या रोजगाराचा प्रश्न मांडला. गावांना



नियमित पाणीपुरवठा करावा, पशुधनासाठी थेट चारा अनुदान द्यावे आणि महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत मजुरांना कामे उपलब्ध करून द्यावीत, अशी मागणी त्यांनी केली.

### जायकवाडीतून १५ ते २० टीएमसी पाण्याची मागणी

आष्टी, पाटोदा आणि शिरूर कासार तालुक्यांतील पाणीटंचाई दूर करण्यासाठी जायकवाडी धरणातून थेट पाइपलाइनद्वारे १५ ते २० टीएमसी पाणी उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी भीमराव धोंडे यांनी केली. तसेच शिंपोरा ते खुंटेफळ सिंचन योजनेतून साठवण तलावात येणाऱ्या पाण्याचे इतर तलावांमध्ये वितरण करण्यासाठी योग्य नियोजन करावे, असेही त्यांनी जलसंपदामंत्र्यांना सांगितले.

### दुष्काळग्रस्त गावांसाठी तीन प्रमुख मागण्या

आष्टी, पाटोदा आणि शिरूर कासार तालुक्यांतील दुष्काळग्रस्त गावांमध्ये नियमित पाणीपुरवठा करावा, पशुधनासाठी थेट चारा अनुदान द्यावे आणि महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत मजुरांना कामे उपलब्ध करून द्यावीत, अशी मागणी भीमराव धोंडे यांनी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे केली. या उपाययोजनांमुळे दुष्काळग्रस्त शेतकरी, पशुपालक आणि शेतमजुरांना दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे.



# रेशीम उत्पादक शेतकऱ्यांसाठी ग्लोबल विकास ट्रस्ट आणि बीड जिल्हा प्रशासनाचा सामंजस्य करार !

## दुष्काळ निवारणासाठी मास्टरप्लॅनवर चर्चा ; बीडमध्ये महत्त्वपूर्ण बैठक

■ परळी वैजनाथ (प्रतिनिधी) :

दुष्काळग्रस्त बीड जिल्ह्याच्या विकासाला गती देण्यासाठी आणि शेतकऱ्यांना आर्थिक आधार देण्याच्या दृष्टीने ग्लोबल विकास ट्रस्ट (GVT) आणि जिल्हा प्रशासनाने महत्त्वपूर्ण पुढाकार घेतला आहे. बीड जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या बैठकीत रेशीम उत्पादक शेतकऱ्यांना प्रोत्साहन व सहकार्य देण्यासाठी सामंजस्य करार करण्यात आला असून, त्यावर स्वाक्षऱ्याही करण्यात आल्या. जिल्ह्याच्या विकासाचा मास्टरप्लॅन आणि दुष्काळ निवारणाच्या उपाययोजनांवर यावेळी सविस्तर चर्चा झाली.

जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या बैठकीला ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष जलनायक मयंक गांधी, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुभाष साळवे, जिल्हा रेशीम अधिकारी एस. बी. वराट यांच्यासह विविध अधिकारी उपस्थित होते. दुष्काळाचा सामना करण्यासाठी दहा कलमी कार्यक्रम, जलसंधारण, टंचाईग्रस्त गावांना टँकरद्वारे पाणीपुरवठा, पशुखाद्य डेपो अथवा चारा छावण्या आणि ‘गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार’ योजनेच्या अंमलबजावणीवर विचारविनिमय करण्यात आला. नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजना टप्पा 2.0 (पोकरा) मध्ये समाविष्ट गावांतील रेशीम उत्पादक शेतकऱ्यांना शासकीय अनुदान येईपर्यंत 3 लाख 20 हजारांचे आर्थिक सहकार्य AU SMALL बँकेच्या माध्यमातून देण्यात येत आहे.

यावेळी डॉ. एम. बी. पाटील लिखित ‘दुष्काळात फळबागा जगवण्याचे उपाय’ या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. तसेच ठिबक सिंचनाच्या शासकीय योजनांचा लाभ घेताना शेतकऱ्यांना येणाऱ्या अडचणी दूर करणे आणि ग्रामपंचायतींकडून प्राप्त झालेल्या पत्रांचा आढावा घेऊन विकासकामांचे नियोजन करणे यावर चर्चा झाली. रेशीम शेतीला प्रोत्साहन, जलसंधारणातून पाणीटंचाईवर मात आणि दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा, या उद्देशाने झालेला सामंजस्य करार आणि बैठकीतील चर्चा बीड जिल्ह्याच्या ग्रामीण विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

# दुष्काळग्रस्त आष्टी, पाटोदा, शिरूरच्या शेतकऱ्यांना दिलासा द्या!

## माजी आमदार बाळासाहेब आजबेंची उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांच्याकडे मागणी; लवकरच दिलासादायक निर्णयाचे आश्वासन

■ आष्टी (प्रतिनिधी) :

आष्टी, पाटोदा आणि शिरूर कासार तालुक्यांमध्ये निर्माण झालेल्या भीषण दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिक मेटाकुटीला आले आहेत. पाणीटंचाई, जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न आणि दूध उत्पादक शेतकऱ्यांसमोरील वाढत्या अडचणी लक्षात घेता, या संकटातून दिलासा देण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी आष्टी विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार बाळासाहेब काका आजबे यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी मुंबई येथे दि. 13 रोजी महाराष्ट्र राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्राताई



अजित पवार यांची भेट घेऊन मतदारसंघातील दुष्काळी परिस्थितीची माहिती दिली आणि विविध उपाययोजनांसाठी निवेदन सादर केले.

आष्टी विधानसभा मतदारसंघात यंदा पावसाचे प्रमाण अत्यल्प राहिल्याने शेती व्यवसाय अडचणीत आला आहे. पिकांचे नुकसान, पिण्याच्या पाण्याची टंचाई आणि जनावरांसाठी चारा उपलब्ध करण्याचे आव्हान यामुळे ग्रामीण भागातील जनजीवन प्रभावित झाले आहे. विशेषतः आष्टी तालुक्यात मोठ्या प्रमाणावर चालणाऱ्या दूध व्यवसायालाही दुष्काळाचा फटका बसत असून, चारा आणि पाण्याअभावी दूध उत्पादक शेतकऱ्यांसमोर आर्थिक संकट उभे राहिले आहे. अशा परिस्थितीत शेतकरी आणि दूध उत्पादकांना तातडीने आर्थिक मदत व आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याची गरज असल्याचे माजी आमदार बाळासाहेब आजबे यांनी उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांच्या निदर्शनास आणून दिले. दुष्काळग्रस्त भागातील शेतकरी आणि सामान्य नागरिकांना दिलासा मिळावा, यासाठी शासनाने तातडीने प्रभावी उपाययोजना राबवाव्यात, अशी भूमिका आजबे यांनी या भेटीदरम्यान मांडली. यावर उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबत सकारात्मक भूमिका घेत लवकरच शेतकऱ्यांसाठी दिलासादायक निर्णय घेण्यात येतील, असे आश्वासन दिल्याची माहिती माजी आमदार बाळासाहेब आजबे यांनी दिली.

# आपला दसरा, आपली परंपरा ; भगवान भक्तीगडावरील दसरा मेळाव्याला मी येतेयं...तुम्हीही सुखरूप या

## ना. पंकजाताईं मुंडे यांनी केले आवाहन; दसरा मेळाव्याला प्रशासनाने दिली परवानगी

■ बीड प्रतिनिधी

राष्ट्रसंत भगवान बाबांच्या जन्मभूमीत सावरगाव घाट येथील भगवान भक्तीगडावर होणाऱ्या दसरा मेळाव्याची दरवर्षीच उत्सुकता असते. लाखोंची गर्दी हे या मेळाव्याचे वैशिष्ट्य असते. या अनुषंगानेच आपली परंपरा, आपला दसरा साजरा करण्यासाठी मी येत आहे,आपणही या पण सुखरूप या व घरी सुखरूप परत जा असे आवाहन राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांनी केले आहे.

भगवान भक्तीगडावर होणारा दसरा मेळावा वंचितांचा शोषितांचा मेळावा म्हणून या दसरा मेळाव्याची ओळख आहे.राष्ट्रसंत भगवान बाबांची जन्मभूमी असलेल्या पाटोदा तालुक्यातील सावरगाव घाट येथील भगवान भक्ती गडावर हा मेळावा दरवर्षी होत असतो. यंदाचा दसरा मेळावा २० ऑक्टोबर रोजी असणार आहे.या दसरा मेळाव्यात ना. पंकजाताई मुंडे यांचे मार्गदर्शन ऐकण्यासाठी राज्यभरातून भगवान बाबांचे भक्त आणि मुंडे समर्थक लाखोंच्या संख्येने भगवान भक्ती गडावर दाखल होत असतात.संत भगवान बाबाची जन्मभूमी असल्याने सावरगाव घाट येथे होणाऱ्या या मेळाव्याला विशेष महत्त्व आहे. सावरगाव घाट येथे पाण्यावर ज्ञानेश्वरी वाचत असलेली राष्ट्रसंत भगवान बाबाची भव्य मूर्ती आणि तळघरात भगवान बाबांची मूर्ती अशा स्वरूपाची भव्य वास्तू येथे असुन या मेळाव्यासाठी लाखोंच्या संख्येने जनसमुदाय दरवर्षी उपस्थित असतो. या पार्श्वभूमीवर भगवान भक्तीगडावर मेळाव्याची तयारी सुरु आहे. या अनुषंगानेच पंकजाताई मुंडे यांनी एका व्हिडिओ द्वारे आवाहन केले आहे.

### प्रशासनाची परवानगी

■ संत भगवानबाबा स्मारक मंदिर परिसरातील भगवान भक्तीगडावर यंदा पारंपरिक दसरा मेळावा २० ऑक्टोबर रोजी घेण्यास प्रशासनाने परवानगी दिली आहे. पाटोद्याचे तहसीलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी यांनी यासंदर्भातील मंजुरी पत्र दिले आहे. आयोजकांनी ६ ऑक्टोबर रोजी दिलेल्या अर्जाच्या अनुषंगाने ही परवानगी देण्यात आली आहे. भगवान भक्तीगडावर दसरा मेळाव्यासाठी सुमारे ५.२७ हेक्टर क्षेत्रातील १० एकर १० गुंठे जागा उपलब्ध असुन याठिकाणी दसरा मेळावा होणार आहे.





# वेलावन सेंथिलकुमारची फायनलमध्ये धडक; बुडापेस्ट स्क्वॉश ओपनमध्ये हंगेरीच्या स्टारशी रंगणार लढत

बुडापेस्ट : भारताचा स्टार स्क्वॉशपटू वेलावन सेंथिलकुमारने PSA बुडापेस्ट स्क्वॉश ओपनच्या अंतिम फेरीत प्रवेश करत शानदार कामगिरी केली आहे. शुक्रवारी झालेल्या रोमांचक उपांत्य सामन्यात सेंथिलकुमारने स्वदेशी वीर चोत्रानीचा ३-२ असा पराभव करत अंतिम फेरी गाठली. दोन्ही भारतीय खेळाडूंमध्ये झालेला हा सामना अत्यंत चुरशीचा ठरला. सेंथिलकुमारने ९-११, ११-८, ११-७, १-११, १२-१० अशा गुणांनी विजय मिळवला. विशेष म्हणजे, निर्णायक पाचव्या गेममध्ये दोन्ही खेळाडूंमध्ये चांगलीच झुंज पाहायला मिळाली. अखेर सेंथिलकुमारने संयम राखत १२-१० असा गेम जिंकला आणि अंतिम फेरीतील आपलं स्थान निश्चित केलं. या स्पर्धेत सेंथिलकुमारची कामगिरी सुरुवातीपासूनच प्रभावी राहिली आहे. उपांत्यपूर्व फेरीत त्याने मलेशियाच्या ईन यो एनजीचा ३-० असा पराभव करत मोठा धक्का दिला होता. त्यानंतर चोत्रानीविरुद्धच्या लढतीतही त्याने दमदार पुनरागमन करत विजय मिळवला. दरम्यान, अंतिम फेरीत सेंथिलकुमारसमोर आता हंगेरीचा स्थानिक खेळाडू बालाझ फारकास याचं आव्हान असणार आहे. फारकासने उपांत्य फेरीत इजिप्तच्या मुस्तफा एलसिर्तीचा ३-० असा सरळ गेममध्ये पराभव करत अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. विशेष म्हणजे सेंथिलकुमार आणि फारकास यांच्यात यापूर्वी दोन सामने झाले असून दोघांनी प्रत्येकी एक सामना जिंकला आहे. त्यामुळे अंतिम सामन्यात दोघांमध्ये पुन्हा एकदा रंगतदार लढत पाहायला मिळणार आहे. आता भारतीय चाहत्यांच्या नजरा सेंथिलकुमारकडे लागल्या असून, बुडापेस्टमध्ये तो विजेतेपदाची ट्रॉफी उंचावतो का, याची उत्सुकता आहे.

# नीरज चोप्राने डायमंड लीगच्या अंतिम फेरीत मिळवले स्थान

■ नवी दिल्ली वृत्तसंस्था



भारताचा स्टार भालाफेकपटू नीरज चोप्राने 2026 डायमंड लीगच्या अंतिम फेरीत स्थान मिळवले आहे. हंगामाची अंतिम फेरी 4 आणि 5 सप्टेंबर रोजी ब्रुसेल्स येथे आयोजित करण्यात येणार आहे. दोन वेळचा ऑलिम्पिक पदकविजेता नीरजने या हंगामात डायमंड लीगच्या दोन टप्प्यांमध्ये सहभाग घेतला. त्याने 19 जून रोजी दोहा टप्प्यात 85.69 मीटरच्या प्रयत्नासह चौथे स्थान मिळवले होते. त्यानंतर 21 ऑगस्ट रोजी लॉझान टप्प्यात 88.05 मीटरची हंगामातील सर्वोत्तम कामगिरी करत दुसरे स्थान मिळवले. नीरज 27 ऑगस्ट रोजी ज्युरिख टप्प्यात सहभागी झाला नाही, जिथे पुरुषांची भालाफेक स्पर्धाही कार्यक्रमात समाविष्ट होती. मात्र, लॉझानमधील त्याच्या कामगिरीने अंतिम फेरीत स्थान पक्के करण्यासाठी पुरेसे गुण मिळवून दिले. नीरजने या हंगामात ग्लासगो राष्ट्रकुल स्पर्धेतही 85.83 मीटरच्या थ्रोसह रौप्यपदक जिंकले होते.

ब्रुसेल्समध्ये होणाऱ्या अंतिम फेरीपूर्वी श्रीलंकेचा रुमेश थारंगा पाथिरागे भालाफेकीच्या गुणतालिकेत अव्वल स्थानावर आहे. त्याने ज्युरिख टप्प्यात 92.07 मीटरच्या शानदार प्रयत्नासह विजय मिळवला. अँडरसन पीटर्स, केशोर्न वॉलकॉट आणि कर्टिस थॉम्पसन हे देखील विजेतेपदाचे प्रमुख दावेदार आहेत. नीरजचे लक्ष त्याच्या दुसऱ्या डायमंड ट्रॉफी विजेतेपदावर असेल. त्याने 2022 मध्ये डायमंड लीगचे विजेतेपद जिंकले होते आणि त्यानंतर तीन वेळा उपविजेता राहिला आहे.

डायमंड लीगमध्ये असे मिळतात गुण

डायमंड लीगमध्ये मे ते सप्टेंबर दरम्यान 14 टप्पे असतात. प्रत्येक स्पर्धेत पहिल्या आठ खेळाडूंना अनुक्रमे 8, 7, 6, 5, 4, 3, 2 आणि 1 गुण मिळतात. नीरजने दोहा येथे चौथ्या स्थानासाठी सात आणि लॉझानमध्ये दुसऱ्या स्थानासाठी पाच गुण मिळवले, ज्यामुळे त्याचे एकूण 12 गुण झाले. केनियाचा ज्युलियस येगो ज्युरिख टप्प्यापूर्वी नऊ गुणांवर होता. ज्युरिखमध्ये 81.66 मीटरच्या प्रयत्नासह पाचव्या स्थानावर राहिल्यानंतर त्याचे 13 गुण झाले आणि त्यानेही अंतिम फेरीसाठी क्वालीफाय केले.

# जर्मनीवर ३-१ असा दणदणीत विजय; भारतीय महिला हॉकी संघाची विश्वचषकात ऐतिहासिक कामगिरी

■ ॲमस्टेलवीन : वृत्तसंस्था



भारतीय महिला हॉकी संघाने FIH महिला हॉकी विश्वचषक २०२६मध्ये शानदार कामगिरी करत पाचव्या स्थानावर स्पर्धेचा शेवट केला. पाचव्या स्थानासाठी झालेल्या सामन्यात भारताने जागतिक क्रमवारीतील बलाढ्य जर्मनीचा ३-१ असा पराभव करत ऐतिहासिक विजय नोंदवला. १९७४च्या पहिल्या विश्वचषकात चौथं स्थान मिळवल्यानंतर भारताची ही विश्वचषकातील सर्वोत्तम कामगिरी ठरली आहे. नेदरलँड्समधील ॲमस्टेलवीनच्या वागेनर स्टेडियमवर झालेल्या या सामन्यात सुरुवातीला दोन्ही संघांकडून सावध खेळ पाहायला मिळाला. पहिल्या दोन क्वार्टरमध्ये एकही गोल झाला नाही. मात्र, सामन्याच्या तिसऱ्या क्वार्टरमध्ये भारतीय संघाने आक्रमक खेळ करत सामन्याचं चित्रच बदलून टाकलं.

भारतासाठी इशिकाने ४३व्या मिनिटाला गोल करत संघाचं खातं उघडलं. त्यानंतर अवघ्या काही मिनिटांत भारताने जर्मनीवर आणखी दोन गोल केले. नवनीत कौरने ४४व्या आणि ४७व्या मिनिटाला सलग दोन गोल करत भारताची आघाडी ३-० अशी मजबूत केली. तीन गोलच्या पिछाडीनंतर जर्मनीने जोरदार पुनरागमन करण्याचा प्रयत्न केला. अखेर लिन क्रिंग्जने ५९व्या मिनिटाला जर्मनीसाठी एक गोल केला. मात्र भारतीय बचावफळीने शेवटच्या क्षणी कोणतीही मोठी चूक होऊ दिली नाही आणि सामना ३-१ असा जिंकला.

या संपूर्ण विश्वचषक मोहिमेत भारताने सातत्यपूर्ण कामगिरी केली. संघाने केवळ एक सामना गमावला, तर चीन, इंग्लंड आणि ऑस्ट्रेलियाविरुद्ध सामने बरोबरीत राखले. दक्षिण आफ्रिकेविरुद्ध भारताने ६-१ असा मोठा विजय मिळवला, तर यजमान आणि ऑलिम्पिक विजेत्या नेदरलँड्सकडून भारताला ०-२ असा पराभव स्वीकारावा लागला. विशेष म्हणजे, भारतीय संघात ११ विश्वचषक पदार्पण करणाऱ्या खेळाडूंचा समावेश होता. त्यामुळे या युवा आणि अनुभवी खेळाडूंच्या मिश्रणाने मिळवलेलं पाचवं स्थान विशेष महत्त्वाचं ठरतं. आता भारतीय संघाचं लक्ष पुढील महिन्यात होणाऱ्या आशियाई क्रीडा स्पर्धेकडे असेल. विश्वचषकातील या ऐतिहासिक कामगिरीमुळे भारतीय महिला हॉकी संघाचा आत्मविश्वास नक्कीच वाढला आहे. भारताने पुन्हा एकदा जागतिक हॉकीच्या मंचावर आपली ताकद दाखवून दिली आहे.

# प्रज्ञानानंदने रचला इतिहास, ग्रँड चेस टूर फायनल जिंकणारा पहिला भारतीय ठरला

■ सेंट लुईस : वृत्तसंस्था



भारतीय बुद्धिबळपटू आणि ग्रँडमास्टर आर. प्रज्ञानानंदाने फॅबियानो करूआनाचा पराभव करत इतिहास रचला आहे. सेंट लुईसमध्ये झालेल्या अंतिम सामन्यात प्रज्ञानानंदाने १५-१३ असा विजय मिळवत विजेतेपद पटकावलं. या विजयासह तो जिंकणारा पहिला भारतीय ठरला आहे. अंतिम सामन्याच्या शेवटच्या दिवशी प्रज्ञानानंदासमोर मोठं आव्हान होतं. तो तब्बल सहा गुणांनी पिछाडीवर होता. पहिल्या क्लासिकल गेममध्ये करूआनाने ६-० अशी आघाडी घेतली, तर दुसरा क्लासिकल सामना ३-३ असा बरोबरीत राहिला.

मात्र, प्रज्ञानानंदाने हार न मानता जबरदस्त पुनरागमन केलं. त्याने दोन्ही रॅपिड गेम जिंकत सामन्यात जोरदार कमबॅक केलं. त्यानंतर ब्लिट्झ गेम्समध्येही त्याने आवश्यक नियंत्रण राखलं आणि अखेर एकूण १५-१३ असा विजय मिळवत ट्रॉफीवर नाव कोरलं. या ऐतिहासिक विजेतेपदासाठी प्रज्ञानानंदाला तब्बल २ लाख अमेरिकन डॉलरचं बक्षीस मिळालं आहे. भारतीय बुद्धिबळासाठीही हा मोठा क्षण मानला जात आहे.

विजयानंतर प्रज्ञानानंदाने या स्पर्धेचं महत्त्व अधोरेखित केलं. जागतिक बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धेनंतर ही जगातील सर्वात प्रतिष्ठित स्पर्धांपैकी एक असल्याचं त्याने म्हटलं. या स्पर्धेचं विजेतेपद मिळवणं आपल्यासाठी अत्यंत अभिमानाची बाब असल्याचंही त्याने सांगितलं. विशेष म्हणजे, प्रज्ञानानंदाने प्रतिकूल परिस्थितीतून केलेलं हे पुनरागमन त्याच्या मानसिक ताकदीचं आणि दबावाखाली खेळण्याच्या क्षमतेचं उत्तम उदाहरण ठरलं आहे. भारतीय बुद्धिबळाच्या इतिहासात प्रज्ञानानंदाच्या या विजयाची नोंद आता एका ऐतिहासिक अध्यायाप्रमाणे झाली आहे.

# दक्षिण आफ्रिकेचा माजी कर्णधार डीन एल्गरने घेतली व्यावसायिक क्रिकेटमधून निवृत्ती



■ नवी दिल्ली : वृत्तसंस्था

दक्षिण आफ्रिकेचा माजी कर्णधार आणि अनुभवी कसोटी सलामीवीर डीन एल्गरने (Dean Elgar Retirement) व्यावसायिक क्रिकेटमधून निवृत्ती घेण्याचा निर्णय घेतला आहे. सध्याचा काउंटी चॅम्पियनशिप हंगाम संपल्यानंतर एल्गर क्रिकेटच्या सर्व प्रकारांना अलविदा करणार आहे. जवळपास दीड दशकाच्या कारकिर्दीत त्याने दक्षिण आफ्रिकेच्या कसोटी संघात महत्त्वाची भूमिका बजावत जगातील विश्वासार्ह कसोटी सलामीवीरांमध्ये आपले स्थान निर्माण केले.

## दक्षिण आफ्रिकेसाठी अशी राहिली कारकीर्द :

डीन एल्गरने दक्षिण आफ्रिकेकडून ८६ कसोटी सामने खेळताना ३५.९२च्या सरासरीने ५,३४७ धावा केल्या. त्याच्या नावावर १४ शतके आणि २३ अर्धशतके आहेत. त्याची सर्वोच्च धावसंख्या १९९ धावा असून, २०१७ मध्ये बांगलादेशविरुद्ध त्याने ही शानदार खेळी केली होती. एल्गरची फलंदाजी आक्रमक फटक्यांपेक्षा संयम, तंत्र आणि कठीण परिस्थितीत मोठी खेळी करण्यासाठी ओळखली जात होती. त्याने दक्षिण आफ्रिकेकडून आठ एकदिवसीय सामनेही खेळले असून, त्यात १७.३३च्या सरासरीने १०४ धावा केल्या.

## २०२४ मध्ये आंतरराष्ट्रीय क्रिकेटला अलविदा :

डीन एल्गरने २०१२ मध्ये आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केले. तब्बल १२ वर्षे दक्षिण आफ्रिकेच्या कसोटी संघाचा महत्त्वाचा भाग राहिल्यानंतर त्याने २०२४च्या सुरुवातीला आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतली. भारताविरुद्ध केपटाऊन येथे झालेली कसोटी त्याची अखेरची आंतरराष्ट्रीय कसोटी ठरली. दुखापतीमुळे टेंबा बावुमाला मैदानाबाहेर जावे लागल्यानंतर एल्गरने या सामन्यात दक्षिण आफ्रिकेचे नेतृत्वही केले. आपल्या शेवटच्या कसोटीत त्याने १८५ धावांची शानदार खेळी करत संघाला मजबूत स्थितीत पोहोचवले. दक्षिण आफ्रिकेने हा सामना एक डाव राखून जिंकत मालिका १-१ अशी बरोबरीत सोडवली.

## काउंटी क्रिकेटमध्ये दुसरी इनिंग :

आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतल्यानंतर एल्गरने इंग्लंडमधील काउंटी क्रिकेटमध्ये आपली दुसरी इनिंग सुरू केली. कसोटी क्रिकेटचे मर्यादित वेळापत्रक आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळण्याच्या कमी होत चाललेल्या संधी लक्षात घेऊन तो Essex संघात दाखल झाला. एसेक्समध्ये त्याने इंग्लंडचा दिग्गज फलंदाज ॲलिस्टर कुकच्या निवृत्तीनंतर निर्माण झालेली पोकळी भरून काढण्याची महत्त्वाची जबाबदारी स्वीकारली.

## Essex कडूनही दमदार कामगिरी :

एल्गरने २०२४ मध्ये एसेक्सकडून काउंटी चॅम्पियनशिपमध्ये शानदार कामगिरी केली. त्याने हंगामात १,००० हून अधिक धावा करत क्लबचा 'Batter of the Year' पुरस्कार मिळवला. याशिवाय २०२४च्या टी२० ब्लास्टमध्येही त्याने ३००हून अधिक धावांचे योगदान दिले. यापूर्वी एल्गरने या संघांकडूनही काउंटी क्रिकेट खेळले आहे. दक्षिण आफ्रिकेतील तसेच आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील त्याचा प्रदीर्घ अनुभव एसेक्सच्या ड्रेसिंग रूमसाठीही महत्त्वाचा ठरला. कठीण परिस्थितीत संयमी फलंदाजी, नेतृत्व आणि संघासाठी योगदान देण्याची वृत्ती यामुळे डीन एल्गरने दक्षिण आफ्रिकेच्या कसोटी क्रिकेटमध्ये आपली वेगळी ओळख निर्माण केली.

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षकांचा दोन गुंडांना दणका!

## बीड शहरातील दोन धोकादायक गुंडांची MPDA कायद्याअंतर्गत हर्सूल कारागृहात रवानगी



**बीड | प्रतिनिधी**

बीड शहरात गुन्हेगारी कारवायांवर वचक निर्माण करण्यासाठी जिल्हा प्रशासन आणि पोलिसांनी अत्यंत कठोर पावले उचलली आहेत. पोलीस अधीक्षक बीड यांच्या मार्फत बीड शहरातील दोन कुख्यात गुंडांवर `एमपीडीए' (MPDA) कायद्यांतर्गत स्थानबद्धतेचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. या प्रस्तावास बीडचे जिल्हाधिकारी श्री. विवेक जॉनसन यांनी १३ ऑक्टोबर २०२६ रोजी मंजुरी दिली आहे. या मंजुरीनंतर दोन्ही गुंडांना छत्रपती संभाजीनगर येथील हर्सूल कारागृहात स्थानबद्ध करण्यात आले आहे.

■ **अक्षय रंगनाथ साखरे (वय ३१ वर्षे, रा. अंकुश नगर, बीड):**

पोलीस स्टेशन बीड शहर यांनी या आरोपीविरुद्ध `धोकादायक व्यक्ती' म्हणून एमपीडीएचा प्रस्ताव सादर केला होता. या आरोपीविरुद्ध मारहाण करून दुखापत करणे, तोडफोड करून नुकसान करणे, जातिवाचक शिवीगाळ करणे आणि जीवे मारण्याच्या धमक्या देण्यासारखे तब्बल ५ गंभीर गुन्हे दाखल आहेत. तसेच १३ मे २०२६ रोजी



त्याच्याविरुद्ध प्रतिबंधक कारवाई करण्यात आली होती, परंतु त्यावरही तो जुमानत नव्हता. १३ ऑक्टोबर २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखा (स्थागुशा) बीडने त्यास ताब्यात घेऊन पोलीस स्टेशन शिवाजीनगर येथे हजर केले, तेथून पोलिसांनी त्यास हर्सूल कारागृहात स्थानबद्ध केले.

■ **भिमा लक्ष्मण मस्के (वय ३९ वर्षे, रा. बलभीम नगर, बीड):**

पोलीस स्टेशन पेठ बीड यांनी याच्याविरुद्ध एमपीडीएचा प्रस्ताव सादर केला होता. या



आरोपीविरुद्ध मारहाण करून दुखापत करणे, गैरकायद्याची मंडळी जमवून जीवे मारण्याचा प्रयत्न करणे, दगडफेक, घरफोडी, रस्ता अडवून जबर चोरी करणे, तडपार प्राधिकरणाच्या आदेशाचे उल्लंघन करणे, सदोष मनुष्यवधाचा प्रयत्न करणे आणि लोकसेवकावर हल्ला करणे यांसारखे तब्बल ९ गंभीर गुन्हे दाखल आहेत. याच्याविरुद्धही प्रतिबंधक कारवाई करण्यात आली होती, तरीही त्याच्या वर्तनात सुधारणा झाली नाही. १३ ऑक्टोबर २०२६ रोजी पेठ बीड पोलिसांनी त्यास ताब्यात घेऊन हर्सूल कारागृह, छत्रपती संभाजीनगर येथे स्थानबद्ध केले.

भविष्यातही वाळूचा चोरा व्यापार करणारे, अवैध गुटकाविक्री करणारे, तसेच सामाजिक व धार्मिक तेढ निर्माण करणारे असामाजिक घटक, दादागिरी करणारे, व दहशत माजविणारे गुंड, तसेच अवैध जुगार, लॉटरी व हाथभट्टीची दारू विकणाऱ्या व्यक्तींवर जास्तीत जास्त `MPDA' आणि `MCOCA' कायद्यांतर्गत कठोर कारवाई करण्याचे स्पष्ट संकेत पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कांवत (भापोसे) यांनी दिले आहेत.

सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक नवनीत कांवत, अपर पोलीस अधीक्षक (बीड) समीर शेख, उपविभागीय पोलीस अधिकारी (बीड) राजीव नवले, आणि स्थागुशापो.नि. शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पो.नि. शितलकुमार बल्लाळ, निलेश केळे, सपोनि सतीश पंडित, प्रितमकुमार पुजारी यांच्यासह पेठ बीड, शिवाजीनगर व स्थानिक गुन्हे शाखेच्या सर्व पोलीस अधिकारी व अंमलदारांनी पार पाडली आहे

# कुणबी–मराठा जात प्रमाणपत्रासाठी पिंपळगाव गाढे येथील नागरिकांचे आमरण उपोषण तहसीलदारांच्या आश्वासनानंतर स्थगित

**परळी वैजनाथ | प्रतिनिधी**



कुणबी–मराठा जात प्रमाणपत्र मिळावे, यासाठी पिंपळगाव गाढे (ता. परळी वैजनाथ) येथील नागरिकांनी १२ आक्टोबर सोमवार पासून आमरण उपोषण सुरू करण्यात आले होते, मंगळवारी (दि.१३) तहसीलदार यांच्या लेखी आश्वासनानंतर उपोषण स्थगित करण्यात आले.

गाढे पिंपळगाव येथील मराठा समाजातील नागरीकांनी सर्व पुरावे दाखल करत कुणबी प्रमाणपत्र मिळावे यासाठी उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले होते. या निवेदनात म्हटले होते की, पिंपळगाव गाढे येथील अनेक नागरिक कुणबी–मराठा समाजातील असून, त्यांच्या पूर्वजांच्या नावांची नोंद महाराष्ट्र शासनाच्या बीड जिल्ह्यातील डिजिटल शासकीय सेवा, सरकारी वेबसाईट तसेच ई-गव्हर्नन्स प्रकल्पाशी संबंधित नोंदींमध्ये कुणबी म्हणून आढळून येत आहे. या पुराव्यांची प्रत अर्जासोबत जोडूनही कुणबी–मराठा जात प्रमाणपत्र देण्यास प्रशासनाकडून टाळाटाळ होत असल्याचा आरोप नागरिकांनी केला. मराठा–कुणबी जातीच्या प्रमाणपत्राची जातपडताळणी झालेली असल्याने तो पुरावा ग्राह्य धरून पात्र अर्जदारांना कुणबी–मराठा जातीचे प्रमाणपत्र द्यावे, अशी मागणी करण्यात आली होती. प्रमाणपत्र न मिळाल्याने सोमवार पासून आमरण उपोषणाला सुरुवात करण्यात आली. मंगळवारी तहसीलदार यांच्या लेखी आश्वासनानंतर रात्री उशिरा उपोषण स्थगित करण्यात आले. उपोषणाला भगवान प्रकाश राडकर, अजित वसंतराव सोनवणे, प्रमोद अच्युतराव सोनवणे, पांडुरंग गंगणे, अनिल राडकर, भाऊसाहेब राडकर, अनंत राडकर, प्रताप गंगणे, काकासाहेब सोनवणे,डिगांबर सोनवणे, शिवा सोनवणे, विनोद सोनवणे इतर नागरिक उपोषणाला बसले होते.

# सावरगाव घाट येथे 20 ऑक्टोंबर रोजी भव्य दसरा मेळावा

## लोखोंच्या संख्येने उपस्थित राह रामभाऊ सानप

**आष्टी प्रतिनिधी**



राष्ट्रसंत भगवान बाबांचे जन्मगाव असलेल्या सावरगाव घाट (भगवान भक्ती गड) येथील यंदाच्या भव्य दसरा मेळावा 20 ऑक्टोबर रोजी मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात पार पडणार आहे.

राष्ट्रसंत भगवान बाबांपासून सुरू असलेली आणि लोकनेते गोपीनाथ मुंडे यांनी जोपासलेली ही ऐतिहासिक परंपरा यंदाही लोकनेत्या पंकजाताई मुंडे यांच्या नेतृत्वाखाली अत्यंत दणक्यात पार पडणार आहे. या मेळाव्याला राज्यभरातून लाखोच्या संख्येने समाज बांधवांनी उपस्थित राहावे अशी आव्हान मी साहेब प्रतिष्ठानच्या वतीने करतो.

परंपरेंची अखंड साकळी आणि दिग्गजांची उपस्थिती , लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांनी सुरू केलेल्या या दसरा मेळाव्याच्या परंपरेने महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि सामाजिक जीवनात एक वेगळे स्थान निर्माण केले आहे. यंदाही हाच आदर्श डोळ्यासमोर ठेवून सोहळा संपन्न होत आहे.

# जव्हारमधील शेतकऱ्यांसाठी BAIF संस्था ठरतेय वरदान!

## मोगरा लागवडीतून रोजगारनिर्मितीचा नवा मार्ग; शेतकऱ्यांची वाडा येथे अभ्यास सहल




**जव्हार (वा.)**

जव्हार तालुक्यातील ग्रामीण आणि अतिदुर्गम भागातील शेतकऱ्यांना पावसाळी शेतीचा हंगाम संपल्यानंतर रोजगाराच्या समस्येला सामोरे जावे लागते. स्थानिक पातळीवर रोजगाराच्या पुरेशा संधी उपलब्ध नसल्याने अनेक शेतकऱ्यांना उदरनिर्वाहासाठी शहरांकडे स्थलांतर करावे लागते. मात्र, या समस्येवर मात करून शेतकऱ्यांना स्थानिक पातळीवर रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी आणि त्यांचे आर्थिक उत्पन्न वाढावे, या उद्देशाने BAIF संस्थेने पुढाकार घेतला असून, मोगरा, आंबा आणि काजू लागवडीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना स्वावलंबी बनविण्याचा प्रयत्न केला जात आहे.

BAIF संस्थेच्या सीमेन्स आशा प्रकल्पांतर्गत जव्हार तालुक्यातील गोरठण, भागडा, मोर्चापाडा, किरमीरा, कायरी, दाभेरी, रुईघर, बोपदरी आणि ढाढरी या गावांतील शेतकऱ्यांना काजू, आंबा आणि मोगरा लागवडीसाठी मदत करण्यात आली आहे. यामध्ये शेतकऱ्यांना रोपांसह तारकुंपण, पाण्याची टाकी, खते, औषधे, सोलरपंप आणि



जलपरी मोटार यांसारख्या आवश्यक सुविधा मोफत उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

■ **मोगरा लागवडीचे प्रत्यक्ष प्रशिक्षण**

शेतकऱ्यांना मोगरा लागवडीचे आधुनिक तंत्रज्ञान आणि योग्य व्यवस्थापनाची माहिती मिळावी, यासाठी वाडा तालुक्यातील उमरेद्याचापाडा येथे शेतकरी अभ्यास सहलीचे आयोजन करण्यात आले होते. या सहलीदरम्यान शेतकऱ्यांना मोगऱ्याची लागवड कशी करावी, पिकाला पाणी किती व कसे द्यावे, कीड व रोगांचे नियंत्रण कसे करावे, कीटकनाशक औषधांचा योग्य वापर कसा करावा आणि फवारणी करताना कोणती काळजी घ्यावी, याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

केवळ लागवडीसाठी साहित्य उपलब्ध करून न देता शेतकऱ्यांना प्रत्यक्ष शेती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण देण्यावरही संस्थेने भर दिला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना मोगरा लागवडीतील तांत्रिक बाबी समजून घेण्यास आणि भविष्यात उत्पादन वाढविण्यास मदत होणार आहे.

या शेतकरी अभ्यास सहलीत BAIF संस्थेचे प्रतिनिधी स्नेहल गायकवाड, योगेश चव्हाण, कैलास चौधरी, नितीन भोये, पावलूश पारधी, कृष्णा चौधरी तसेच शेतकरी शांताराम जाधव आदी उपस्थित होते. त्यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.

■ **शेतीतून स्वावलंबनाचा संकल्प**

BAIF संस्थेच्या प्रतिनिधींनी सांगितले की, शेतकऱ्यांना काजू, आंबा आणि मोगरा लागवडीसाठी आवश्यक मदत व सुविधा मोफत उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या सुविधांचा योग्य वापर करून शेतकऱ्यांनी मेहनतीच्या जोरावर शेतीतून उत्पन्न वाढवावे आणि स्वावलंबी बनावे, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे.

पावसाळी शेतीनंतर रोजगारासाठी होणारे स्थलांतर कमी करण्यासाठी अशा प्रकारचे शेतीपूरक उपक्रम महत्त्वपूर्ण ठरू शकतात. मोगरा लागवडीसारख्या पर्यायी पिकांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना वर्षभर उत्पन्नाचे साधन उपलब्ध होण्याची संधी निर्माण होत आहे.

BAIF संस्थेच्या या उपक्रमामुळे जव्हार तालुक्यातील दुर्गम भागातील शेतकऱ्यांना नवी दिशा मिळत असून, शेतीच्या माध्यमातून आर्थिक प्रगती साधण्याची आशा निर्माण झाली आहे. संस्थेच्या मदतीबरोबरच शेतकऱ्यांची मेहनत, योग्य मार्गदर्शन आणि आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा वापर यांची सांगड घातल्यास ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडू शकतो.

# वाचनसंस्कृतीतून घडेल ज्ञानसमृद्ध आणि विवेकशील समाज

१५ ऑक्टोबर हा दिवस भारताचे माजी राष्ट्रपती, थोर शास्त्रज्ञ आणि तरुणांचे प्रेरणास्थान डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त 'वाचन प्रेरणा दिन' म्हणून साजरा केला जातो. हा दिवस म्हणजे केवळ पुस्तकांचे महत्त्व सांगण्याचा किंवा वाचनाची औपचारिक शपथ घेण्याचा दिवस नसून ज्ञानाशी मैत्री करण्याचा, विचारांना नवी दिशा देण्याचा आणि समाजात विवेकशीलतेची जाणीव निर्माण करण्याचा संकल्प करण्याचा दिवस आहे. डॉ. कलाम यांनी आपल्या जीवनप्रवासातून जिज्ञासा, ज्ञान, परिश्रम आणि स्वप्नांच्या सामर्थ्याची ओळख करून दिली. प्रतिकूल परिस्थितीवर मात करून त्यांनी विज्ञानाच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिले आणि देशाच्या सर्वोच्च घटनात्मक पदापर्यंत मजल मारली. त्यांच्या जीवनातून शिक्षण आणि ज्ञान यांचे परिवर्तनकारी सामर्थ्य स्पष्ट होते. वाचन हे ज्ञानप्राप्तीचे प्रभावी साधन असून ते व्यक्तीच्या विचारविश्वाला समृद्ध करते, आत्मविश्वास वाढवते आणि जीवनातील आव्हानांना सामोरे जाण्याची क्षमता विकसित करते. म्हणूनच वाचन प्रेरणा दिनाचे औचित्य साधताना वाचनाचे वैयक्तिक, शैक्षणिक, सामाजिक आणि सांस्कृतिक महत्त्व समजून घेणे आवश्यक आहे.

मानवी संस्कृतीच्या विकासात वाचनाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. मानवाने आपल्या अनुभवांचे, निरीक्षणांचे, ज्ञानाचे आणि विचारांचे जतन करण्यासाठी लेखनकला विकसित केली. त्यातून एका पिढीने मिळविलेले ज्ञान पुढील पिढीपर्यंत पोहोचविणे शक्य झाले. मौखिक परंपरेतून जतन झालेले ज्ञान आणि लिखित स्वरूपातील साहित्य यांच्या परस्परसंवादातून मानवी संस्कृतीचा प्रवास अधिक समृद्ध झाला. आज आपण प्राचीन समाजव्यवस्थांचा अभ्यास करू शकतो, ऐतिहासिक घटनांचा अर्थ लावू शकतो, विविध संस्कृतींची ओळख करून घेऊ शकतो आणि अनेक शतकांपूर्वीच्या विचारवंतांशी वैचारिक संवाद साधू शकतो, यामागे वाचन आणि लेखनाची परंपरा आहे. पुस्तकांमुळे काळ आणि अवकाश यांच्या मर्यादा ओलांडून ज्ञानाची देवाणघेवाण शक्य होते. एखाद्या व्यक्तीला आपल्या प्रत्यक्ष अनुभवांच्या पलीकडील असंख्य घटना, व्यक्ती आणि विचार समजून घेण्याची संधी वाचनातून मिळते. त्यामुळे वाचन हे केवळ वैयक्तिक छंदाचे साधन नसून मानवी ज्ञानपरंपरा जतन करणारे आणि तिचा विस्तार करणारे महत्त्वाचे माध्यम आहे.

वाचन म्हणजे केवळ अक्षरे ओळखणे, शब्दांचे उच्चारण करणे किंवा पुस्तकातील मजकूर पूर्ण करणे नव्हे. वाचन ही आकलन, चिंतन, विश्लेषण आणि आत्मपरीक्षण यांची एकत्रित प्रक्रिया आहे. एखादे पुस्तक वाचताना वाचक लेखकाच्या विचारांशी संवाद साधतो. लेखकाने मांडलेले अनुभव, तर्क, निरीक्षणे आणि निष्कर्ष समजून घेण्याचा प्रयत्न करतो. काही विचार त्याला पटतात, तर काही विचारांबद्दल प्रश्न निर्माण होतात. काही वेळा पुस्तकातील एखादा विचार आपल्या पूर्वीच्या समजुतींना आव्हान देतो आणि नव्याने विचार करण्यास प्रवृत्त करतो. या प्रक्रियेमुळे चिकित्सक बुद्धी विकसित होते. प्रत्येक गोष्ट परंपरेने सांगितली आहे म्हणून स्वीकारण्याऐवजी तिची सत्यता, उपयुक्तता आणि सामाजिक परिणाम तपासण्याची वृत्ती निर्माण होते. वाचनामुळे माणूस एखाद्या प्रश्नाकडे एकाच दृष्टिकोनातून न पाहता त्याचे विविध पैलू समजून घेण्याचा



**डॉ. राजेंद्र बगाटे,**
**(समाजशास्त्राचे अभ्यासक)**

प्रयत्न करतो. माहितीच्या प्रचंड प्रवाहात सत्य आणि असत्य, तथ्य आणि मत, तर्क आणि अफवा यांतील फरक ओळखण्यासाठी आज अशा चिकित्सक वाचनाची विशेष गरज आहे.

वाचनाची गोडी बालपणापासून निर्माण झाली, तर तिचे सकारात्मक परिणाम आयुष्यभर अनुभवता येतात. बालवयात गोष्टी, कविता, चित्रपुस्तके आणि बोधकथांच्या माध्यमातून मुलांना भाषेची ओळख होते. त्यांच्या शब्दसंग्रहात भर पडते, कल्पनाशक्ती विकसित होते आणि स्वतःचे विचार व्यक्त करण्याची क्षमता वाढते. कथांमधील विविध पात्रे, त्यांचे संघर्ष आणि त्यातून निर्माण होणारे अनुभव मुलांना मानवी स्वभाव समजून घेण्यास मदत करतात. मैत्री, सहकार्य, प्रामाणिकपणा, धैर्य, समता आणि करुणा यांसारख्या मूल्यांची ओळख साहित्याच्या माध्यमातून होऊ शकते. मुलांना प्रश्न विचारण्याची मुभा दिली आणि वाचलेल्या गोष्टींबद्दल चर्चा केली, तर त्यांची जिज्ञासा अधिक बळकट होते. मात्र, वाचनाची सवय लावताना केवळ अभ्यासक्रमातील पुस्तकांवर भर देणे पुरेसे नाही. वयोगटानुसार विज्ञानकथा, निसर्गविषयक साहित्य, चरित्रे, प्रवासवर्णने आणि मनोरंजक कथा उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. वाचनाला सक्तीचे काम न बनवता आनंददायी अनुभव बनविणे ही पालक आणि शिक्षकांची महत्त्वाची जबाबदारी आहे.

कुटुंब हे वाचनसंस्कृतीचे पहिले केंद्र आहे. घरातील मोठी माणसे नियमितपणे पुस्तके, वर्तमानपत्रे आणि नियतकालिके वाचत असतील, तर मुलांनाही वाचनाची प्रेरणा मिळते. घरात मोठा ग्रंथसंग्रह असणे प्रत्येकाला शक्य नसले, तरी काही आवडीची पुस्तके उपलब्ध करून देणे, वाढदिवसाला पुस्तक भेट देणे, वाचलेल्या गोष्टींवर चर्चा करणे आणि दररोज काही वेळ वाचनासाठी राखून ठेवणे शक्य आहे. पालकांनी मुलांच्या हातातील भ्रमणध्वनी काढून घेण्यापुरते मर्यादित न राहता त्यांना पर्यायी आनंददायी कृती उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. पुस्तकांतील कथा, चित्रे आणि माहिती यांचा परिचय करून दिल्यास मुलांना पडद्यावरील मनोरंजनाबरोबरच वाचनातून मिळणाऱ्या आनंदाचीही जाणीव होते. मुलांनी कोणते साहित्य वाचावे याबाबत मार्गदर्शन आवश्यक असले, तरी त्यांच्या आवडीचा आदर करणेही महत्त्वाचे आहे. वाचनाची सवय एका दिवसात निर्माण होत नाही; ती सातत्यपूर्ण प्रोत्साहन, उपलब्ध साधने आणि घरातील अनुकूल वातावरण यांतून विकसित होते.

शिक्षणव्यवस्थेत वाचनाला मध्यवर्ती स्थान देणे ही काळाची गरज आहे. शाळा आणि महाविद्यालये ही केवळ परीक्षा घेणारी किंवा पदवी प्रदान करणारी केंद्रे नसून स्वतंत्रपणे विचार करणाऱ्या व्यक्ती घडविणारी ज्ञानकेंद्रे असली पाहिजेत. पाठ्यपुस्तके विद्यार्थ्यांना विषयाचे मूलभूत ज्ञान देतात; परंतु अवांतर वाचनामुळे त्या ज्ञानाचा विस्तार होतो. इतिहासाच्या विद्यार्थ्याने विविध इतिहासकारांची मते, चरित्रे आणि ऐतिहासिक साधने वाचली, तर घटनांचे अनेक पैलू समजू शकतात. विज्ञानाच्या विद्यार्थ्याने वैज्ञानिकांचे जीवनकार्य आणि संशोधनविषयक साहित्य वाचले, तर त्याच्यात शोधक वृत्ती विकसित होऊ शकते. समाजशास्त्राच्या विद्यार्थ्याला जात, वर्ग, लिंग, ग्रामीण जीवन, नागरीकरण, सामाजिक विषमता आणि सामाजिक परिवर्तन यांचे आकलन विविध ग्रंथांमधून होते. साहित्याच्या वाचनामुळे मानवी भावविश्व आणि सामाजिक वास्तव समजण्यास मदत होते. त्यामुळे विद्यार्थ्यांचे मूल्यमापन केवळ पाठांतरावर आधारित न ठेवता आकलन, विश्लेषण, प्रश्ननिर्मिती, चर्चा आणि स्वतंत्र लेखन यांनाही महत्त्व दिले पाहिजे.

दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
बीड, गुरुवार, 15 ऑक्टोबर 2026

# परळी मतदारसंघ पदवीधर मेळाव्यास मोठ्या संख्येने उपस्थित रहा

## गोविंदराव देशमुख, वैजनाथराव सोळंके, राजाभाऊ औताडे, अय्युब भाई पठाण यांचे आवाहन

## धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वात परळीत आज पदवीधरांचा मेळावा, मतदारसंघातील पदवीधर तसेच महायुतीच्या पदाधिकाऱ्यांना उपस्थित राहण्याचे आवाहन



**परळी वैद्यनाथ (प्रतिनिधी)**

मराठवाडा पदवीधर विधानपरिषद निवडणूक २०२६ चे राष्ट्रवादी काँग्रेस व महायुतीचे अधिकृत उमेदवार सतीश भानुदासराव चव्हाण यांच्या प्रचारार्थ आज (ता. १५) रोजी माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वात परळी वैद्यनाथ विधानसभा मतदारसंघातील पदवीधरांचा मेळावा आयोजित करण्यात आला असून या मेळाव्यास मतदारसंघातील तमाम पदवीधर मतदार तसेच राष्ट्रवादी काँग्रेस, भाजप, शिवसेना, रिपाई आठवले गट यांसह महायुतीतील घटक पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी उपस्थित रहावे, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेसचे परळी विधानसभा अध्यक्ष गोविंदराव देशमुख, परळी तालुकाध्यक्ष वैजनाथराव सोळंके, अंबाजोगाई तालुकाध्यक्ष राजाभाऊ औताडे, परळी शहराध्यक्ष अय्युब भाई पठाण यांनी केले आहे.

आज गुरुवार दि. १५ रोजी परळी वैद्यनाथ शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरातील अक्षता मंगल कार्यालयात माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वाखाली हा पदवीधर मेळावा संपन्न होणार असून, आ. धनंजय मुंडे यांच्यासह मान्यवर उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत, त्यामुळे या मेळाव्यास मतदारसंघातील तमाम पदवीधर मतदार बांधव तसेच महायुतीतील घटक पक्षाच्या सर्व पदाधिकारी, विविध आघाडी व फ्रंटल सेलचे पदाधिकारी यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



# आ. सुरेश धस यांच्या पुढाकाराने कंत्राटी वीज कामगारांच्या थकीत वेतनाचा प्रश्न मार्गी

## जयदत्त भैय्या धस यांच्या माध्यमातून पाठपुरावा; कंत्राटी कामगारांकडून आभार व्यक्त

**आष्टी प्रतिनिधी :**



आष्टी महावितरण उपविभागांतर्गत विविध पदांवर कार्यरत असलेल्या कंत्राटी वीज कामगारांचे मागील दोन महिन्यांपासून वेतन रखडल्याने त्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत होता. कुटुंबाचा उदरनिर्वाह, घरखर्च आणि दैनंदिन गरजा भागवताना कामगारांना अडचणी येत होत्या. या गंभीर प्रश्नाची दखल घेत आमदार सुरेश आण्णा धस यांच्या पुढाकाराने थकीत वेतनाचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी पाठपुरावा करण्यात आला.

कंत्राटी वीज कामगारांच्या वतीने तांत्रिक कामगार संघटनेचे अध्यक्ष मनोज निबाळकर यांनी युवक नेते जयदत्त भैय्या धस यांच्याकडे वेतन रखडल्याची समस्या मांडली. कामगारांची अडचण लक्षात घेऊन जयदत्त भैय्या धस यांनी तातडीने आमदार सुरेश आण्णा धस यांच्याशी संपर्क साधत हा प्रश्न त्यांच्या निदर्शनास आणून दिला.

यानंतर आमदार सुरेश धस यांनी महावितरणच्या मानव संसाधन (एच. आर.) विभागाशी तसेच बीड येथील कार्यकारी अभियंत्यांशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधला. कंत्राटी कामगारांचे दोन महिन्यांपासून रखडलेले वेतन लवकरात लवकर अदा करण्यात यावे, यासाठी त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांकडे पाठपुरावा केला. त्यांच्या हस्तक्षेपामुळे वेतनाच्या प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी हालचालींना गती मिळाली.

कंत्राटी वीज कामगारांच्या वेतनाचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी पुढाकार घेतल्याबद्दल कामगारांनी आमदार सुरेश आण्णा धस आणि युवक नेते जयदत्त भैय्या धस यांचे आभार व्यक्त केले. तसेच कर्मचाऱ्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील असलेले तांत्रिक कामगार संघटनेचे पदाधिकारी विठ्ठल अण्णा शेंबडे, प्रशांत दादा पोकळे, अमृत राजे आजबे आणि ज्येष्ठ नेते भाऊसाहेब निंबाळकर काका यांच्यासह या कामासाठी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहकार्य करणाऱ्या सर्व पदाधिकारी व कर्मचाऱ्यांप्रति कंत्राटी कामगारांनी कृतज्ञता व्यक्त केली.

कंत्राटी वीज कामगारांच्या वेतनाचा प्रश्न ऐरणीवर आल्यानंतर लोकप्रतिनिधी आणि संघटनेच्या माध्यमातून झालेल्या पाठपुराव्यामुळे कामगारांच्या अडचणी प्रशासनापर्यंत पोहोचल्या. त्यामुळे रखडलेल्या वेतनाचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी झालेल्या प्रयत्नांबाबत कामगारांनी समाधान व्यक्त केले.

# वरिष्ठ पत्रकार असोसिएशनच्या बीड जिल्हाध्यक्षपदी प्रशांत बर्दापूरकर यांची नियुक्ती

**अंबाजोगाई प्रतिनिधी**



वरिष्ठ पत्रकार असोसिएशन, महाराष्ट्रच्या बीड जिल्हाध्यक्षपदी ज्येष्ठ पत्रकार प्रशांत बर्दापूरकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. संघटनेच्या वतीने १२ ऑक्टोबर २०२६ रोजी नियुक्तीबाबतची अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आली. या नियुक्तीमुळे बीड जिल्ह्यातील पत्रकारिता क्षेत्रातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

वरिष्ठ पत्रकार असोसिएशनच्या कोअर समितीच्या बैठकीत राज्यातील विविध विभाग आणि जिल्ह्यांच्या पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्यांबाबत निर्णय घेण्यात आला. त्यानुसार बीड जिल्ह्याची जबाबदारी प्रशांत बर्दापूरकर यांच्याकडे सोपविण्यात आली आहे. सप्टेंबर २०२६ पासून संबंधित पदाधिकारी संघटनेत कार्यरत झाल्याचे अधिसूचनेत नमूद करण्यात आले आहे.

पत्रकारांच्या प्रश्नांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे, पत्रकारांच्या हक्कांसाठी संघटितपणे प्रयत्न करणे, पत्रकारितेतील व्यावसायिक मूल्यांचे जतन करणे आणि जिल्ह्यातील पत्रकारांमध्ये समन्वय वाढविणे, अशा विविध विषयांवर संघटनेच्या माध्यमातून काम करण्याची संधी या नियुक्तीमुळे उपलब्ध झाली आहे.

राज्यस्तरावर डॉ. जयपाल पाटील यांची अध्यक्षपदी, मिलिंद वैद्य यांची उपाध्यक्षपदी, संजयकुमार जोशी यांची सरचिटणीसपदी आणि चंद्रकांत कांबळे यांची कोषाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

बीड जिल्हाध्यक्षपदी प्रशांत बर्दापूरकर यांची निवड झाल्याबद्दल त्यांचे पत्रकारिता क्षेत्रातून अभिनंदन करण्यात येत असून, त्यांच्या नेतृत्वाखाली जिल्ह्यातील पत्रकारांच्या विविध प्रश्नांना प्रभावीपणे वाचा फोडली जाईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# परळी मतदारसंघ महायुतीच्या वतीने गुरुवारी पदवीधरांचा मेळावा; धनंजय मुंडे करणार मार्गदर्शन

## सतीश चव्हाण यांच्या विजयी चौकारासाठी धनंजय मुंडेंकडून मोर्चेबांधणी

**परळी वैद्यनाथ (प्रतिनिधी)**



मराठवाडा पदवीधर मतदारसंघ विधानपरिषदेच्या निवडणुकीच्या अनुषंगाने महायुतीच्या वतीने परळी वैद्यनाथ विधानसभा मतदारसंघाचा पदवीधरांचा गुरुवार (ता.१५) रोजी सकाळी साडेअकरा वाजता मेळावा आयोजित करण्यात आला असून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते, माजी मंत्री आ. धनंजय मुंडे हे या मेळाव्यातून पदवीधरांशी संवाद साधणार आहेत.

हा मेळावा सकाळी साडेअकरा वाजता परळी वैद्यनाथ शहरातील अक्षता मंगल कार्यालय (छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसर) येथे आयोजित करण्यात येत असून पदवीधरांचे आमदार सतीश भानुदास चव्हाण यांच्या विजयी चौकारासाठी धनंजय मुंडे यांच्याकडून परळी विधानसभा मतदारसंघात जोरदार मोर्चेबांधणी केली जात आहे.

या मेळाव्यास परळी विधानसभा मतदारसंघातील सर्व पदवीधर तसेच राष्ट्रवादी काँग्रेस, भाजप, शिवसेना, रिपाई (आठवले गट) यांसह महायुतीच्या सर्व पदाधिकारी, विविध आघाडी व फ्रंटल सेलचे पदाधिकारी आदींनी उपस्थित रहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

# तेली समाज सार्वजनिक दांडिया महोत्सवात शिक्षण सभापती योगेश मेनकुदळे यांच्या हस्ते सपत्नीक आरती

**परळी वैजनाथ (प्रतिनिधी)**

तेली समाज सार्वजनिक दांडिया महोत्सवाचे यंदा पाचवे पुष्प उत्साहात सुरू असून, मंगळवारी तिसऱ्या माळेची आरती परळी नगरपालिकेचे शिक्षण सभापती योगेशजी मेनकुदळे यांच्या हस्ते सपत्नीक करण्यात आली.

यावेळी तेली समाज दांडिया महोत्सव समितीच्या वतीने शिक्षण सभापती योगेशजी मेनकुदळे यांचा सपत्नीक पुष्पहार व शाल देऊन सत्कार करण्यात आला. तसेच त्यांच्या पत्नी सौ. माधुरी योगेश मेनकुदळे यांचाही उत्सव समितीच्या वतीने सन्मान करण्यात आला. महोत्सवाच्या निमित्ताने महिलांसाठी दांडियासोबतच आकर्षक वेशभूषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेस महिलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. स्पर्धेचे परीक्षक म्हणून नागनाथ आप्पा हालगे इंजिनिअरिंग कॉलेजच्या प्राचार्या डॉ. अश्विनी चाटे मॅडम यांनी काम पाहिले. महिलांचा मोठा सहभाग आणि उत्साह यामुळे महोत्सवात आनंदाचे वातावरण निर्माण झाले. या कार्यक्रमास मलिकार्जुन साखरे, नागनाथ आप्पा भाग्यवंत, छगन आप्पा क्षीरसागर, अशोक बेंडे, चंद्रशेखर फुटके, ओंकार सोनटक्के, अजय सोनटक्के, शिवशंकर जठार, विनोद आळणे, शिवराज सोनटक्के, सोमनाथ क्षीरसागर, महारुद्र विटेकर यांच्यासह तेली समाज दांडिया उत्सव समितीचे अध्यक्ष तथा युवानेते पवन फुटके, सोमनाथ वाघमारे, अशोक रोकडे, राजकुमार भाग्यवंत, सचिन लासे, सतीश फुटके, राहुल क्षीरसागर, सुनील क्षीरसागर, दीपक साखरे, ईश्वर राऊत, रवी अन्नपूर्णे, शंकर कौले, ईश्वर जठार, गजानन बेंडे, प्रदीप पिंपळे, महेंद्र अन्नपुर्णे, अमोल क्षीरसागर योगेश व्यवहारे आणि प्रसाद जठार उपस्थित होते.



